सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

दिनांक :- २०/१०/२०२१

महासभा क्रमांक :- ०५

ठराव क्रमांक :- १२०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्य श्री.मैनुद्दीन शमशुद्दीन बागवान यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील **कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.**

महासभा ठराव क्र.९८ दि.२०/०१/२०२१ च्या ठरावानुसार बेडग रस्त्यावरील मनपा कॉमन इन्सिनेटर प्रकल्प व त्यास आवश्यक जागा व सद्यस्थितीतील इमारतीचा ताबा देवून सदर प्रकल्प IMA पुलाची शिरोली यांना प्रति महा र.रु.४० हजार रॉयल्टी भरणेच्या अटीवर पंधरा वर्षे मुदतीने देणेस मान्यता देणेत आलेली होती. सदरचा पारित करणेत आलेला ठराव रद्द करणेत येवून, मा.महासभा ठराव क्र.४७ दि.१२/०५/२०२१ अन्वये सदरचा प्रकल्प प्रतिमहा र.रु.४० हजार रॉयल्टी भरुन घेवून, महापालिका शर्ती-अटीनुसार १५ वर्षे मुदतीने IMA मिरज यांना पुर्वीप्रमाणेच चालविण्यास देणेस मान्यता देणेत आलेली होती.

तथापि, मा.महासभा ठराव क्र.९८ दि.२०/०१/२०२१ हा रद्द करुन आणि महासभा ठराव क्र.४७ दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता देवून सुद्धा अद्याप सदर प्रकल्प चालू करणेत आलेला नाही. सदर बायोमेडीकल वेस्ट प्रकल्प हा महानगरपालिका क्षेत्रातील आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा असून, सदर प्रकल्प तातडीने मार्गी लागण्याच्या दृष्टीने यापूर्वी सदर प्रकल्प चालविण्याचा अनुभव असणारे कोकण केअर एंटरप्रायजेस् यांनी प्रकल्प चालविणेस देणेबाबत वारंवार मागणी केलेली आहे. तसेच,प्रतिमहा रॉयल्टीची र.रु.५० हजार भरणेची तयारी दर्शविली असून, त्यामध्ये महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होणार असलेने, बायोमेडीकल वेस्ट प्रकल्प कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक त्या सुधारणा सदर प्रकल्पाच्या जागेवर करुन, सर्व प्रक्रिया पूर्ण करुन, MPCB यांची परवानगी आणण्याची जबाबदारी कोकण केअर एंटरप्रायजेस् यांचेवर निश्चित करुन, प्रतिमहा र.रु.५० हजार रॉयल्टी महानगरपालिकेस भरणेच्या अटीवर सदरचा प्रकल्प कोकण केअर एंटरप्रायजेस् यांना पंधरा वर्षे मुदतीने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- श्री.मैनुद्दीन बागवान

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- श्री.शिवानी दुबे.

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०५ दिनांक :- २०/१०/२०२१

ठराव क्रमांक :- १२१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सन्मा.सदस्या सौ.नसिमा गैबिसो नाईक यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १(के) नुसार सर्वानुमते ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.७४६/१ येथील सिंधी मार्केट मधील गाळेधारक यांची मुदत दि.३१/०३/२०१२ रोजी संपलेली असलेने, त्यांना सन २०१४ चे वाणिज्य मुल्य दरानुसार सुधारीत दराने भाडे आकारणी करुन २९ वर्षे मुदतवाढ देणेबाबत प्रशासनाकडून विषयपत्र महासभेकडे मान्यतेसाठी पाठविलेले होते.

त्यावर मा.महासभा ठराव क्र.१३२ दि.१७/०१/२०२१५ अन्वये सदरची भाडेवाढ व्यापाऱ्यांना परवडणारी नसून, ती कमी करणेबाबत व्यापाऱ्यांनी मागणी केल्याने व्यापाऱ्यांची मागणी मान्य करुन, या मार्केट मधील १ ते ५१ गाळ्यांना सरसकट वार्षिक रु.५०००/- प्रमाणे भाढेवाढ करण्यास मान्यता देवून, २९ वर्ष मुदतवाढ देणेत आलेली होती. प्रशासनाने सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे विखंडीत करणेस पाठविलेला असून, त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.सदरचा प्रस्ताव मा.शासन स्तरावर प्रलंबित असलेने, महापालिका व गाळेधारक या दोघांचेही नुकसान होत आहे. याबाबत पुर्नविचार करणे गरजेचे आहे.

सिंधी मार्केट मधील गाळेधारकांचे मागणीचा विचार करता, गेल्या ३-४ वर्षात या भागात पूर व कोरोना परिस्थिती यामुळे व्यापार कोलमडलेला आहे. पुरामुळे व्यापारी पेढ्यांचे फार मोठे नुकसान झालेले असून, अनेक मोठे व्यापारी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर होत आहेत. या पेठेतील छोटे व्यापारी टिकणेसुद्धा आवश्यक आहे. तसेच जे व्यापारी इतरत्र स्थलांतर करु शकत नाहीत. तेच या ठिकाणी व्यापार करुन, कोराना व महापूरामुळे उद्भवलेल्या बिकट परिस्थितीतून सावरत आहेत. या मार्केट जवळ असलेल्या शाळा नं.१ मधील गाळ्यांचा भाडे करार पाहता त्यांना रु.६३०००/- प्रतिवर्ष भाडे मान्य करण्यात आलेले आहे. म्हणजे सदरचे भाडे कराराप्रमाणे प्रति चौ.मि.रु.१०९८/- असे आकारणी केलेले आहे. या शॉपिंग सेंटर जवळच हे सिंधी मार्केट आहे. त्या प्रमाणे तेथील गाळ्यांची भाडे आकारणी केल्यास रु.४२४९/- प्रतिवर्ष प्रमाणे आकारणी होते. त्यामध्ये वाढ करुन ती रु.५०००/- प्रति प्रतिवर्ष भाडेवाढ आकारणी करुन, त्यानुसार भाडे आकारणी करणेत यावी. तसेच, पूर्वीच्या ठरावानुसार सन २०१२ पासून सन २०२१-२२ पर्यतची भाडे आकारणी करुन, थकबाकी व सेवाकर भरुन घेवून, महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार दि.०१/०४/२०२२ पासून २९ वर्षे मुदतीने मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- N.G.Nair सौ. नसीमा नाईक

ठराव सर्वानुमते मंजुर

D.P.Suyarchi

महापौर,

अनुमोदक :- श्री.फिरोज पठाण